# आरे कार डेपो ते मरोळ स्थानक भुयारी मेट्रो रेल्वेची यशस्वी चाचणी

■ मुंबई

२०१६ पासून बांधकाम सुरू असलेल्या कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मुंबई मेट्रो ३ लाईन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईतील पहिल्या भुयारी मार्गातील आरे कार डेपो ते मरोळ स्थानक दरम्यान काल बुधवारी यशस्वी चाचणी घेण्यात आली.

या मेट्रो-३ भुयारी मार्गावर ऑगस्ट महिन्यापासून विविध स्तरांवर चाचण्या घ्यायला सुरुवात करण्यात आली आहे. बऱ्याच चाचण्या अद्याप बाकी आहेत.आरे डेपो ते मरोळ स्थानक हा तीन किलोमीटरचा मार्ग याच भुयारी मार्गात येतो.या मार्गावर आणखी काही सुधारणा लागतील की नाही हे समजण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून काल बुधवारी ही यशस्वी चाचणी घेण्यात आली. दरम्यान, बीकेसी आणि धारावीला जोडण्यासाठी ३ भुयारे आहेत.एकूण ८ डब्यांची ही पहिली मेट्रो असणार आहे. प्रत्येकी ४२ टन वजनाचा कोच



या मेट्रोला जोडण्यात आला आहे.मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ३३.५ किमी लांबीचा हा कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा भूमिगत मेट्रो कॉरिडोर तयार करत आहे.